तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रारंभ : १९२६

नागपूर शनिवार, १७ सप्टेंबर २०१६ । युगाब्द - ५११८ । मूल्य ५ रुपये । पृष्ठे १८ www.tar


# सर्वधर्म समभाव पदयात्रा २ ऑक्टोबरला

तभा वृत्तसेवा
नागपूर, १६ सप्टेंबर

समाजा समाजामध्ये जातीय तेढ दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे राज्यात अस्थिरतेचे वातावरण तयार होत आहे. त्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी सर्वधर्म समभाव पदयात्रा २ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजता तिरपुडे सोशल वर्क महाविद्यालयातून काढण्यात येणार असल्याची माहिती राजकुमार तिरपुडे यांनी दिली.

जातीय तणाव हा विकासासाठी मारक आहे. त्यासाठी संपूर्ण विदर्भात सर्व धर्मसमभाव यात्रा काढण्यात येणार आहे.

या रॅलीच्या माध्यमातून विदर्भात चांगला संदेश जनतेपर्यंत पोहोचेल. विदर्भातील वातावरण बिघडू नये, अशी आमची अपेक्षा आहे. या पदयात्रेत विविध संघटना सहभागी होणार आहेत. पदयात्रा शहरातील विविध भागांतून मार्गक्रमण करेल.

विविध जाती धर्मात सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न या पदयात्रेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध गीतकार साहिर लुधियानवी यांनी गीतांच्या माध्यामातून समाजात सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनाही या उपक्रमाच्या माध्यमातून आंदराजली वाहण्यात येईल, असेही तिरपुडे यांनी सांगितले. ■